


दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २५६ वा | सोमवार दि २२ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बुलढाणा जिल्ह्यात भाजपाच ठरला मोठा भाऊ...

## भाजप ४ तर काँग्रेस ३ शिवसेनाकडे १ नगराध्यक्ष.. २८६ पैकी ८९ नगरसेवकही भाजपच्या पारड्यात काँग्रेस ६० जागा शिवसेना ४६...



जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातल्या ११ नगरपालिकांसाठी आज मतमोजणी झाली. अनेक ठिकाणचे निकाल नेत्यांना धडा शिकवणारे ठरले आहेत. बुलढाणा, चिखली, मेहकर आणि खामगाव नगरपालिकेकडं जिल्ह्याचं लक्ष लागून होतं. बुलढाण्यात शिवसेनेच्या पूजा गायकवाड १८ हजार ५२५ मते घेऊन विजयी झाल्यात, दुसऱ्या क्रमांकावर महाविकास आघाडीच्या लक्ष्मी काकस तर भाजपाचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या पत्नी अर्पिता शिंदे तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या आहेत. चिखली नगरपालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. सुरुवातीपासूनच भाजपाचे उमेदवार पंडितराव देशमुख यांनी घेतलेली आघाडी टिकवून ठेवली, शेवटी त्यांच्याच विजयावर शिक्कामोर्तब झालं. देऊळगाव राजात मनोज कायदे यांच्या विरोधात माजी मंत्री डॉ. शिंगणे, माजी आ. शशिकांत खेडेकर एकत्र आले होते. मात्र मनोज कायंदे आणि भाजपाच्या युतीनं दोन्ही माजी आमदारांच्या उमेदवाराला पाणी पाजलं. तिथं माधुरी तुषार शिपणे विजयी झाल्या. सिंदखेडराजात मात्र भाजपा आणि राष्ट्रवादीच्या युतीला यश मिळालं नाही. तिथे डॉ. राजेंद्र शिंगणे यांचे कट्टर समर्थक शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे सौरभ तायडे विजयी झाले. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे होमग्राउंड असलेल्या मेहकरात त्यांना मोठा धक्का बसला असून मेहकर इथं भाजपा आणि शिवसेना वेगवेगळे लढले आहेत. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे किशोर गारोळे यांची मेहकर नगराध्यक्षपदी वर्णी लागली. खामगाव नगरपरिषदेत राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या वहिनी अपर्णा फुंडकर यांनी एकतर्फी विजय मिळवला. काँग्रेसच्या उमेदवार स्मिता भोसले दुसऱ्या क्रमांकावर राहिल्या. मलकापुरात भाजपाचे आमदार चैनसुख संचेती यांना सुद्धा मोठा धक्का बसला. तिथं काँग्रेसचे उमेदवार अतिक जवारीवाले नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. शेगावात काँग्रेस उमेदवार प्रकाश एकनाथ शेगोकार मतमोजणीच्या शेवटच्या टप्प्यात विजयी झाले आहेत. लोणारमध्ये काँग्रेसच्या मीरा भूषण मापारी नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत. जळगाव जामोदमध्ये भाजपाचे गणेश दांडगे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले आहेत. नांदुऱ्यात भाजपाच्या मंगलाताई सुधीर मुरेकर नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आहेत. एकंदरीत बुलढाणा जिल्ह्यात भाजपाच्या ४ नगरपालिका ताब्यात आल्या, तर काँग्रेसच्या ३, शिवसेना १, उबाठा १, राष्ट्रवादी काँग्रेस १, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) १ त्यामुळं जिल्ह्यात भाजपाच मोठा भाऊ असल्याचं या निकालावरून स्पष्ट झालं आहे.

# पालिका निवडणुकांत नेत्यांच्या नातेवाइकांचा दबदबा; अपवाद वगळता सर्वांनीच खेचला विजय !

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्यातील पालिका निवडणुकांत यंदा एक वेगळाच ट्रेंड ठळकपणे पुढे आला. राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांनीही मैदान मारले. काही अपवाद वगळता बहुतांश ठिकाणी मतदारांनी ओळखीच्या नावांवरच विश्वास टाकल्याचे निकालातून स्पष्ट झाले. अनुभव, संघटन आणि थेट संपर्क यांची सांगड घालत नातेवाईक उमेदवारांनी विजय मिळवला, ही बाब स्थानिक राजकारणात चर्चेचा विषय ठरली आहे. खामगावमध्ये कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या वहिनी अपर्णा फुंडकर यांनी नगराध्यक्षपदाची निवडणूक जिंकत आपली छाप पाडली. मंत्रिपदाच्या पार्श्वभूमीचा फायदा, संघटनाची साथ आणि प्रचारातील सातत्य या त्रिसूत्रीचा लाभ त्यांना झाल्याचे बोलले जाते. नांदुऱ्यात काँग्रेसचे माजी आमदार राजेश एकडे यांचे चिरंजीव प्रणव एकडे यांनी अल्प मताधिक्याने विजय मिळवला. काट्याच्या लढतीतही मतदारांनी घराणेशाहीपेक्षा ओळखीचा चेहरा म्हणून त्यांना पसंती दिल्याचे दिसते. बुलढाण्यात हा ट्रेंड अधिक ठळक ठरला. शिंदेसेनेचे विद्यमान आमदार संजय गायकवाड यांच्या पत्नी पूजा गायकवाड यांनी ४,८७० मतांनी काँग्रेसच्या लक्ष्मी काकस यांचा पराभव केला. विशेष म्हणजे या लढतीत त्यांनी भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या पत्नी व नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अर्पिता शिंदे यांनाही मागे टाकले. याचबरोबर आमदार गायकवाड यांचे चिरंजीव मृत्यूंजय गायकवाड यांनी प्रभाग क्रमांक सहामधून विजय मिळवत आपल्या राजकीय कारकिर्दीचा श्रीगणेशा केला. मतदानाच्या दिवशी या प्रभागात बोगस मतदानाचा मुद्दा गाजला होता; त्यामुळे निकालाकडे विशेष लक्ष होते. मृत्यूंजय गायकवाड यांनी खुल्या प्रवर्गातून नगराध्यक्षपदासाठी दीड-दोन वर्षे तयारी केली होती. मात्र आरक्षण महिलांसाठी निघाल्याने डाव बदलला आणि अखेर आई पूजा गायकवाड यांना उमेदवारी देण्यात आली; तर त्यांनी स्वतः नगरसेवकपदाची लढत जिंकली. एकूणच, या निवडणुकांत नातेवाईक हा मुद्दा नुसता आरोप न राहता मतदारांच्या पसंतीचा निकष ठरल्याचे चित्र जिल्हाभर उमटले आहे. आता राजकारणात हे संधी मिळालेले नातेवाई काय करिष्मा करतात याकडे लक्ष लागून रहाले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# तेलाची निसरडी वाट...




अशक्यप्राय दावे करण्यात किंवा आत्मविश्वासाने कोणत्याही गोष्टीचे सुलभीकरण करण्यात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कोणीही हरवू शकत नाही. गेल्या वर्षीच्या निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी सत्तेवर आल्यानंतर रशिया आणि युक्रेनमधील युद्ध २४ तासांत संपवू, असा दावा केला होता. सत्तेवर येऊन दहा महिन्यांहून अधिक काळ लोटला तरी ट्रम्प यांना हे युद्ध थांबवता आलेले नाही. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे अमेरिकेच्या अटी-शर्तींवर युद्धविराम करण्यास तयार नाहीत; ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. चर्चेतून मार्ग निघत नसल्याने, ट्रम्प यांनी रोझनेफ्ट आणि ल्युकॉइल या प्रमुख रशियन तेल कंपन्यांवर ऑक्टोबरमध्ये निर्बंध लादले. रशियाची अर्थव्यवस्था तेल आणि गॅस निर्यातीवर अवलंबून असल्याने, हे निर्बंध रशियाला कमकुवत करून युद्धविरामासाठी राजी करतील, अशी ट्रम्प यांना आशा आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष जो बायडेन यांच्यापेक्षा आपण वेगळे आहोत हे दाखवण्याचा ट्रम्प नेहमी प्रयत्न करतात. मात्र, यापूर्वी बायडेन यांनी वापरलेले निर्बंधाचे शस्त्रच ट्रम्प आता वापरत आहेत. आजवरचा निर्बंधांचा इतिहास पाहिल्यास, निर्बंधांमुळे अपेक्षित परिणाम होतोच, असे दिसत नाही. इराण, इराक, व्हेनेझुएला, रशिया हे देश खनिज तेलाच्या निर्यातीवर अवलंबून आहेत; परंतु अमेरिका आणि पाश्चात्य राष्ट्रांनी निर्बंध लादल्यानंतरही त्यांची निर्यात पूर्णपणे ठप्प झालेली नाही. या देशांनी निर्यातीची पर्यायी व्यवस्था उभी केल्यामुळे निर्बंधांचा अपेक्षित परिणाम साधला गेलेला नाही. अमेरिकेने रशियन तेल कंपन्यांवर घातलेल्या नवीन निर्बंधांमुळे भारतीय तेल कंपन्यांसमोर अचानक मोठी अडचण उभी राहिली आहे. या वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत भारताने रशियाकडून दररोज १.९ दशलक्ष बॅरल तेल खरेदी केले, जे रशियाच्या एकूण निर्यातीच्या जवळपास ४० टक्के होते. भारतातील सरकारी तेल शुद्धीकरण कंपन्या रोझनेफ्ट आणि ल्युकॉइल यांच्याकडून थेट तेल खरेदी न करता, मध्यस्थांमार्फत खरेदी करतात. रशियन तेलाचा व्यापार सुकर व्हावा म्हणून दुबई आणि सिंगापूरमध्ये अनेक तृतीय-पक्ष व्यापारी कंपन्या (थर्ड पार्टी ट्रेडर्स) तयार झाल्या आहेत. यापूर्वी अमेरिकेने लादलेले निर्बंध पाळतही कंपन्यांना तेल आयात करणे यामुळे शक्य झाले होते. रशिया तेल निर्यात करताना किमतीत सूट देत असल्याने, सरकारी कंपन्या आणि रिलायन्ससारख्या खासगी कंपन्या मोठ्या आनंदाने तेल विकत घेत होत्या. काही वर्षांपूर्वी प्रति बॅरल २० डॉलरपर्यंत मिळणारी सूट जागतिक बाजारातील तेलाचे दर कमी होताच कमी झाली. मात्र, ही सूट मिळत असल्याने भारतीय तेल कंपन्यांच्या नफ्यात वाढ झाली. युक्रेनमधील युद्धापूर्वी भारताच्या एकूण तेल आयातीत रशियाचा वाटा दोन टक्क्यांपेक्षा कमी होता, तो आता वाढून सुमारे ३५ टक्के झाला आहे. अमेरिकेच्या नवीन निर्बंधांमुळे आता भारतीय आयातदारांना या दोन रशियन कंपन्यांकडून खरेदी थांबवण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. रशियातून भारतात येणारे जवळपास सर्वच तेल याच दोन कंपन्यांकडून येते, त्यामुळे आगामी काळात रशियाकडून होणारी आयात मोठ्या प्रमाणात कमी होईल. रशियाकडून होणारी आयात कमी झाली किंवा बंद झाली तरी भारतात तेलाचा तुटवडा निर्माण होणार नाही, कारण जागतिक बाजारात तेलाचे अतिरिक्त उत्पादन होत आहे. ओपेक संघटना आणि इतर उत्पादक देश रशियाची पोकळी सहज भरून काढतील. मात्र, ट्रम्प यांचा आग्रह आहे की भारताने अमेरिकेकडून तेल आयात वाढवावी. एकेकाळी अमेरिका जगातील सर्वात मोठा खनिज तेल आयातदार होता. मात्र, गेल्या दोन दशकांत शेल तंत्रज्ञानामुळे अमेरिकेचे तेल आणि गॅसचे उत्पादन वेगाने वाढले आणि पाच वर्षांपूर्वी अमेरिका निर्यातदार बनला. सध्या अमेरिका जगातील सर्वात मोठा तेल उत्पादक आहे. ट्रम्प यांना निवडणुकीच्या प्रचारासाठी तेल कंपन्यांनी सढळ हाताने मदत केली होती आणि या कंपन्यांचे हित अमेरिकेतून वाढत्या निर्यातीत आणि जागतिक बाजारात तेलाचे दर चढे राहण्यात आहे. अमेरिकेमध्ये खनिज तेलाच्या मागणीतील वाढ मंदावली आहे आणि इलेक्ट्रिक वाहनांमुळे त्यात वाढ होण्याची शक्यताही नाही. अशा परिस्थितीत अमेरिकेला एक हक्काचा ग्राहक हवा आहे. सध्या जगामध्ये खनिज तेलाच्या मागणीत सर्वाधिक वाढ भारतात होत आहे. खनिज तेलाच्या बाबतीत आपण जगातील तिसरी मोठी बाजारपेठ आहोत. त्यामुळे हा ग्राहक मिळवण्यासाठी अमेरिका व्यापार करार आणि निर्बंधांच्या माध्यमातून भारतावर दबाव टाकत आहे. जर आपण अमेरिकेकडून खनिज तेलाची आयात वाढवली, तर साहजिकच अमेरिकेची भारतासोबतची व्यापार तूट कमी होऊन द्विपक्षीय व्यापार करार करणे सोपे होईल. जगभरातील व्यापार अजूनही मुख्यतः अमेरिकी डॉलरमध्ये होतात. डॉलरसोबतच अमेरिका जगातील वित्तीय बाजारपेठ नियंत्रित करते. त्यामुळे भारतीय कंपन्यांना अमेरिकी निर्बंध पाळण्याशिवाय पर्याय नाही. इंडियन ऑइल असो किंवा रिलायन्स, तेलाची आयात करण्यासाठी त्यांना भांडवल हवे असते. अमेरिकेने लादलेले निर्बंध झुगारल्यास त्यांना भांडवल उभे करणे शक्य होणार नाही. निर्बंध घातलेल्या कंपन्यांसोबत व्यवहार केल्यामुळे जागतिक पत मानांकन संस्था (क्रेडिट रेटिंग एजन्सीज) संबंधित कंपन्यांचे रेटिंग कमी करू शकतात, ज्यामुळे त्यांना वित्तीय बाजारातून अधिक व्याजदर देऊन कर्ज घ्यावे लागेल. त्यामुळे भारतीय कंपन्यांना नाइलाजाने स्वस्तातील रशियन तेलावर पाणी सोडून महागडे पर्याय स्वीकारावे लागणार आहेत. विकत नव्हता, तर तेथून भारतात तेल आणण्यासाठीचा समुद्री वाहतूक खर्च अमेरिकेतून तेल आणण्यापेक्षा तुलनेने कमी आहे.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कोकाटे सभापती तर भाऊ कंत्राटदार होता', वकिलांचा युक्तिवाद, हायकोर्टाकडून कोकाटेंच्या राजीनाम्याबाबत विचारणा

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माणिकराव कोकाटे यांना नाशिक सत्र न्यायालयाने दिलेल्या शिक्षेला मुंबई हायकोर्टात आव्हान देण्यात आलं. माणिकराव कोकाटे यांचे वकील रवींद्र कदम यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. मुंबई हायकोर्टात आज या प्रकरणावर सुनावणी पार पडली. यावेळी कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला. माणिकराव कोकाटे यांच्या वकिलांनी यावेळी कोर्टात जोरदार युक्तिवाद केला. माणिकराव सध्या रुग्णालयात आयसीयूत दाखल आहेत. त्यांच्यावर अँजिओप्लास्टी केली जाणार आहे. त्यामुळे त्यांना सोमवार किंवा मंगळवारपर्यंत दिलासा मिळावा, अशी मागणी कोकाटेंच्या वकिलांनी केली. यावेळी कोकाटे यांच्या वकिलांनी युक्तिवादात मुद्देसूदपणे सर्व आरोप फेटाळले. पण कोकाटे यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या हस्तक्षेप याचिकेच्या याचिकाकर्त्यांनी जोरदार विरोध केला. तसेच सरकारी वकिलांनी देखील युक्तिवाद केला. सर्व युक्तिवादानंतर



कोर्टाने वकिलांना काही प्रश्न विचारले.माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात दाखल करण्यात आलेल्या हस्तक्षेप याचिकेच्या याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला. 'माणिकराव कोकाटे यांनी घर मिळवण्यासाठी राजकीय ताकदीचा वापर केला. कोकाटेंच्या वकिलांकडे २५ एकर जमीन होती. कोकाटे आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रभागात नव्हते', असा युक्तिवाद हस्तक्षेप याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. त्यावर कोर्टाने माणिकराव कोकाटे यांच्या मालकीची २५ एकर जमीन होती याचे पुरावे मागितले.माणिराव कोकाटे सभापती होते. त्यांनी जे केलं त्याची त्यांना माहिती होती. ते वकील आहेत. त्यांना कायद्याची माहिती असतानाही त्यांनी गोरगरिबांसाठीच्या प्रवर्गातून अर्ज केला आणि सदनिका लाटल्या. माणिकराव कोकाटे यांचा भाऊ कंत्राटदार होता आणि त्यांची २५ एकर जमीन होती. दोघे त्यावेळी आर्थिक दुर्बल घटकात येत नव्हते', असा युक्तिवाद हस्तक्षेप याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी युक्तिवाद केला. दरम्यान, युक्तिवादावेळी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या प्रकरणाचा दाखला कोर्टासमोर देण्यात आला. पण हे प्रकरण वेगळं असल्याचा निवाळा कोर्टाने दिला.साक्षीदार असलेल्या पोलीस पाटील यांची साक्ष वकील अनिकेत पाटील यांनी कोर्टात वाचून दाखवली. पोलीस पाटील म्हणाले होते की, मी कोकाटे यांच्या मालमत्तेचा अंदाज बांधला होता. मला पक्की माहिती नाही. त्यावर कोर्टाने आक्षेप घेतला. खटला सुरु असताना २५ एकर जमीन नसल्याचं नाकारलं नाही तर यावर का बोलत आहेत? असा सवाल कोर्टाने केला. तसेच जमिनीतून तुम्ही ऊसाचं उत्पन्न घेत होता तर उत्पन्न नव्हतं असं म्हणता येत नाही, असं निरीक्षण कोर्टाने नोंदवलं. तुमच्याकडे खरंच कुठली जमीन नाही का? असा सवाल कोर्टाने केला. त्यावर अनिकेत निकम यांनी शेती आणि वकिली हे उत्पन्नाचे स्रोत होते, असं वकील अनिकेत निकम यांनी स्पष्ट केलं. हायकोर्टाने सरकारली वकिलांना तुमची याचिकेला विरोध आहे की नाही? असा प्रश्न विचारला. पण सरकारी वकिलांना त्यावर थेट उत्तर देता आलं नाही. मला फक्त फॅक्ट मांडण्यास सांगितलं असल्याचं सरकारी वकिलांनी युक्तिवादावेळी म्हटलं. तसेच आमचा शिक्षेच्या स्थगितीच्या मागणीला विरोध आहे, असं सरकारी वकील म्हणाले.

## कल्याणमध्ये माजी आमदार सुभाष भोईर भाजपात जाणार

**ठाणे :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला धक्क्यावर धक्के दिले जात असतानाच, आता भाजपने माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का दिला आहे. कारण उद्धव ठाकरे यांना कठीण काळात सोडून न गेलेले माजी आमदार सुभाष भोईर यांनी भाजपात जाण्याचा निर्णय घेतला आहे. सुभाष भोईर यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत ठाकरे गटाच्या तिकीटावर कल्याण ग्रामीण मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. पण या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. कल्याण ग्रामीण मतदारसंघातील उद्धव ठाकरेंचे खंदे समर्थक म्हणून सुभार भोईर यांची ओळख होती.

पण आता सुभाष भोईर यांनीदेखील ठाकरेंना पाठ दाखवली आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेपुढे आव्हान वाढणार आहे.मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण ग्रामीणचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार सुभाष भोईर यांचा उद्या भाजप पक्षप्रवेश होणार



आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत उद्या सकाळी अकरा वाजता त्यांचा पक्षप्रवेश होणार आहे. या पक्षप्रवेशावेळी सुभाष भोईर काय म्हणतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे. सुभाष भोईर यांच्या भाजप प्रवेशामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेलाही कल्याण ग्रामीण मतदारसंघात अनेक आव्हानांना सामोरं जाण्याची शक्यता आहे. कारण एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांचा कल्याण लोकसभा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात अनेक विरोधक आता भाजपच्या गोटात सहभागी होताना दिसत आहेत.काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाचे माजी नगरसेवक दीपेश म्हात्रे यांच्यासह अनेक दिग्गजांनी भाजपात प्रवेश केल्याचं बघायला मिळालं होतं.

## वि.परिषदेत मविआचं संख्याबळ ७ ने घटणार

**मुंबई :** काँग्रेसला रामराम ठोकत प्रज्ञा सातव यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर, विधान परिषदेतील काँग्रेस आणि विशेषतः महाविकास आघाडीचे संख्याबळ कमी झाले आहे. यामुळे विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पदाबाबत काय निर्णय घेतला जातो, याबाबत तर्कवितर्क वर्तविले जात आहेत. मात्र नववर्षात परिषदेतील महाविकास आघाडीचे संख्याबळ आणखी कमी होणार असल्याने, ज्येष्ठांच्या सभागृहातही आघाडीला सरकारविरोधात आवाज उठवणे कठीण होणार आहे.आगामी वर्षात, २०२६ मध्ये शिवसेना उबाठा पक्षाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह काँग्रेसचे राजेश राठोड, अभिजीत वंजारी, जयंत आसगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस शपचे शशिकांत शिंदे आदींचा परिषदेतील कार्यकाळ संपणार आहे. त्यामुळे नववर्षात विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद आणि महाविकास आघाडीचे संख्याबळ हा पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरणार आहे.

## भागवतांचा एकेरी उल्लेख करणाऱ्या कलाटेंच्या भाजप प्रवेशाला विरोध

**पिंपरी-चिंचवड :** ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राहुल कलाटे भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू आहे. पण त्यांच्या प्रवेशाला भाजपमधूनच तीव्र विरोध होत आहे. विशेषतः पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २५ मध्ये भाजपचे इच्छुक उमेदवार आणि शहर उपाध्यक्ष राम वाकडकर यांनी उघडपणे कलाटे यांच्या प्रवेशाला विरोध दर्शवला आहे. राम वाकडकर यांनी आरोप केला की, भाजपमध्ये प्रवेश करून थेट उमेदवारी तिकीट मिळवण्याचे षडयंत्र राहुल कलाटे यांचे आहे. ङ्खसरसंघचालक मोहन भागवत यांचा एकेरी उल्लेख करणाऱ्या आणि आरएसएसच्या एका पदाधिकाऱ्याला मारहाण केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीला भाजपमध्ये स्थान देऊ नये,ङ्ख अशी ठाम मागणी त्यांनी पक्षश्रेष्ठींकडे केली आहे.गेल्या बारा वर्षांपासून आम्ही भाजपचे एकनिष्ठ कार्यकर्ते आहोत. प्रभाग क्रमांक २५ मध्ये भाजपचा एकही सदस्य नसताना देखील आम्ही संघटन वाढीसाठी काम करत होतो. पक्ष कोणालाही उमेदवारी देईल, त्यासाठी आम्ही काम करू; मात्र आयात उमेदवाराला पक्षात घेण्यास आमचा स्पष्ट विरोध आहेङ्ख, अशी भूमिका भाजपचे उपाध्यक्ष राम वाकडकर यांनी मांडली.गेल्या बारा वर्षांपासून आम्ही भाजपचे एकनिष्ठ कार्यकर्ते आहोत. प्रभाग क्रमांक २५ मध्ये भाजपचा एकही सदस्य नसताना देखील आम्ही संघटन वाढीसाठी काम करत होतो. पक्ष कोणालाही उमेदवारी देईल, त्यासाठी आम्ही काम करू; मात्र आयात उमेदवाराला पक्षात घेण्यास आमचा स्पष्ट विरोध आहेङ्ख, अशी भूमिका भाजपचे उपाध्यक्ष राम वाकडकर यांनी मंडली.दरम्यान, राहुल कलाटे यांनी भाजप प्रवेशाबाबत अद्याप स्पष्ट भूमिका मांडलेली नाही. ङ्खराजकीय नेते आणि मित्रमंडळी यांच्याशी चर्चा करून, प्रभागातील परिस्थितीचा विचार करून निर्णय घेणार आहे. पुढील एक-दोन दिवसांत सर्वांची मनसिकता पाहून अंतिम निर्णय घेईन, अशी प्रतिक्रिया त्यानी दिली आहे.एकूणच, पिंपरी-चिंचवड भाजपमध्ये 'आयात उमेदवार विरुद्ध निष्ठावान कार्यकर्ते' असा संघर्ष उफाळून आला आहे.

## भाजपकडून तोच खेळ पुन्हा; 'त्या' प्रस्तावानं शिंदेसेनेत अस्वस्थता

**मुंबई :** भारतीय जनता पक्ष मुंबई महापालिकेत १५० जागा लढण्याच्या तयारीत आहे. २२७ प्रभाग असलेल्या मुंबई महापालिकेसाठी भाजप नं १५०-५०-२७ चा प्रस्ताव तयार केला आहे. मुंबई महापालिकेसाठी १५ जानेवारीला मतदान होईल. १६ जानेवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. भाजप मुंबईत मोठा भाऊ असेल. त्यांनी १५० जागा लढवण्याची तयारी करत शिंदेसेनेला ५० जागा देऊ केल्या आहेत. तर अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस सोबत आल्यास त्यांना २७ जागा सोडण्याची तयारी दर्शवण्यात आली.मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम आणि शिंदेसेनेचे नेते उदय सामंत यांच्यात जागावाटपासंदर्भात चर्चा झाली. भाजप १५० जागा लढवण्यासंदर्भात कोणतंही दुमत नाही. अन्य जागांवर चर्चा होईल, असं अमित साटम यांनी सांगितलं. बाकीच्या जागांचा तिढा लवकरच सुटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.द न्यू इंडियन एक्स्प्रेसनं सुत्रांच्या हवाल्यानुसार दिलेल्या वृत्तानुसार, भाजप १५० पेक्षा अधिक जागा लढवण्याच्या तयारीत आहे. गेल्या निवडणुकीत आम्ही ८२ जागा जिंकल्या. सोबत ५० हून अधिक जागा केवळ बंडखोरीमुळे गमावल्या. या प्रभागांमध्ये भाजपचे अधिकृत



उमेदवार आणि भाजपचे बंडखोर उमेदवार यांच्या मतांची बेरीज विजयी झालेल्या उमेदवारापेक्षा अधिक होते, असा तर्क भाजपकडून दिला जात आहे.भाजपनं १५० हून जागांवर दावा केला आहे. आम्ही शिवसेनेला ५० जागा देण्यास तयार आहोत. बाकीच्या २७ जागा अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सोडल्या जातील. नवाब मलिक यांच्या नेतृत्त्वाचा मुद्दा निकाली निघाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस सोबतही युती होईल,' अशी माहिती सुत्रांच्या हवाल्यानं देण्यात आली आहे.भाजपनं दिलेल्या ५० जागांच्या प्रस्तावामुळे शिंदेसेनेत तीव्र नाराजी आहे. आम्हाला किमान ७० जागा द्या, अशी शिंदेसेनेची मागणी आहे. 'आम्ही केवळ ५० जागा लढवल्या, तर अधिक जागा जिंकण्याच्या शक्यता कमी होतात. त्यामुळे मुंबईतील आमचं प्राबल्य संपुष्टात येईल. भाजपनं १०० च्या आसपास जागा जिंकल्यास त्यांना कदाचित आमची गरज भासणार नाही. छोटे पक्ष आणि अपक्षांच्या साथीनं ते बहुमताचा आकडा गाठू शकतील. त्या परिस्थितीत त्यांना शिवसेनेची आवश्यकता नसेल. आम्हाला ती परिस्थिती नको आहे,' असं शिंदेसेनेतील नेत्यानं सांगितलं.विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर शिंदेसेनेचं महायुतीमधील महत्त्व एकाएकी घटलं. कारण त्यावेळी भाजपनं १४९ जागा लढवून १३२ जागा जिंकल्या. तर शिंदेसेनेनं ८१ जागा लढवत ५७ जागांवर बाजी मारली. भाजपनं अधिक जागा लढवत बहुमताच्या आसपास जातील इतक्या जागांवर विजय मिळवला. त्यामुळे शिंदेसेनेची कोंडी झाली. तोच खेळ पालिकेत होऊ नये यासाठी शिंदेसेना सावध आहे.

# मोटार चालू करू नकोस; भावांमध्ये पाण्यावरून थरार, चुलत्यानं कत्ती अन पुतण्यानं कुऱ्हाडीने..




**बीड :** पाणी म्हणजे जीवन असे म्हटले जाते, पण बीड जिल्ह्यात याच पाण्यासाठी सख्ख्या भाऊ एकमेकांच्या जिवावर उठल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. केज तालुक्यातील येवता येथे विहिरीच्या पाण्यावरून दोन गटांत झालेल्या रक्तरंजित संघर्षाने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. या वादात कुऱ्हाड, कत्ती आणि काठ्यांचा वापर करण्यात आला, दोन्ही बाजूचे लोक गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी केज पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या एकूण ८ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, येवता येथील मल्हारी लक्ष्मण सक्राते आणि त्यांचा सख्खा भाऊ अशोक लक्ष्मण सक्राते यांच्यात विहिरीच्या पाण्यावरून जुना वाद होता. काल सायंकाळी साडेसहाच्या सुमारास हा वाद विकोपाला गेला. मल्हारी शेतात असताना अशोक आणि त्याच्या मुलांनी तिथे येऊन 'विहीर आमची आहे, मोटार चालू करू नकोस,' असे म्हणत वाद उकरून काढला. मल्हारी यांनी 'पाळीने पाणी घेऊ' असे सुचवले, मात्र रागाच्या भरात असलेल्या अशोकने थेट कुऱ्हाडीने मल्हारी यांच्या डोक्यात वार केला.दुसरीकडे कत्ती आणि दगडाने मारहाण केली असे अशोकचा मुलगा प्रणव याने चुलत्यावर गंभीर आरोप केले आहेत. प्रणवच्या दाव्यानुसार, तो विहिरीवर मोटार सुरू करण्यासाठी गेला असता, चुलते मल्हारी, दीपक, प्रवीण आणि शारदा सक्राते यांनी त्याला अडवले. यावेळी झालेल्या झटापटीत मल्हारी सक्राते यांनी धारदार कत्तीने प्रणवच्या हातावर वार केला, तर इतरांनी दगडाने बेदम मारहाण केली.

पोलीस कारवाई आणि परिसरात खळबळ या घटनेत दोन्ही गटातील लोक जखमी झाले असून त्यांच्यावर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मल्हारी सक्राते यांच्या फिर्यादीवरून अशोक सक्राते, प्रणव, समाधान आणि शिवकन्या यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तर प्रणवच्या फिर्यादीवरून मल्हारी, दीपक, प्रवीण आणि शारदा यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पाण्यासाठी सख्ख्या भावांनी एकमेकांविरुद्ध शस्त्रे उपसल्याने परिसरात संताप आणि चर्चेचा विषय बनला आहे. केज पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून गावात तणावपूर्ण शांतता आहे.

## उंच भिंती तरीही 'माल' पोहचलाच!

**नाशिक :** राज्याची सुरक्षा यंत्रणा आणि कारागृह प्रशासनासाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कारागृहाच्या कडक बंदोबस्ताला सुरुंग लावत आतमध्ये मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी झाल्याचे उघड झाले आहे. कारागृहातील मंडल क्रमांक ७ मध्ये कैद्यांकडून सुमारे १ लाख ७ हजार ८०० रुपये किमतीचे अमली पदार्थ आणि अमली पदार्थ सेवनासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या गंभीर घटनेमुळे नाशिक रोड पोलीस ठाण्यात १८ डिसेंबर रोजी दोन कैद्यांसह एका अज्ञात इसमाविरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून संपूर्ण पोलीस दलात खळबळ उडाली आहे.१० डिसेंबर रोजी सकाळी ९:४० च्या सुमारास कारागृह प्रशासनाकडून नियमित तपासणी सुरू होती. यावेळी मंडल क्रमांक ७ मधील यार्ड क्रमांक १ आणि ४ मध्ये संशयास्पद हालचाली दिसून आल्या. तपासणी पथकाने जेव्हा बंदी दिलीप कचरू सोळुंके याची बारकाईने झडती घेतली, तेव्हा त्याच्याकडे असलेला अमली पदार्थांचा साठा पाहून अधिकारीही अवाक झाले. त्याच्याकडे १०४ ग्रॅम चरस, ३१.५ मिलीग्रॅम गांजा सदृश पदार्थ, ४ मिलीग्रॅम एम.डी. (चऊ) आणि अमली पदार्थांच्या सेवनासाठी लागणारे १५ रोलिंग पेपर असा एकूण सव्वा लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे की, न्यायालयीन कोठडीत असलेल्या स्वप्नील दिनेश उनवणे याच्या सांगण्यावरून एका बाहेरील अज्ञात व्यक्तीने हे अमली पदार्थ अत्यंत बेकायदेशीर मार्गाने कारागृहाच्या आत पोहोचवले होते.कारागृहाच्या तटबंदी आणि चोख पहारा भेदून हे अमली पदार्थ आतमध्ये आलेच कसे, हा मोठा प्रश्न आता निर्माण झाला आहे. याप्रकरणी कारागृह हवालदार सुनील सोमा रोकडे यांनी फिर्याद दिली असून, त्यानुसार नाशिक रोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या तस्करीच्या मागे कारागृहातील अंतर्गत कोणाचे संगनमत आहे का? किंवा बाहेरून हे पदार्थ भिंतीवरून फेकले गेले की कच्च्या कैद्यांच्या माध्यमातून आत आले? याचा सखोल तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे नाशिक रोड कारागृहातील सुरक्षा यंत्रणेचे वाभाडे निघाले असून, वरिष्ठ स्तरावर या प्रकरणाची दखल घेतली जाण्याची शक्यता आहे.

## असं काय घडलं की भाचे जावयाने संपवलं?

**छत्रपती संभाजीनगर :** पैठण तालुक्यातील पाटेगाव येथे गोदावरी नदीत पुलाखाली सापडलेल्या अनोळखी मृतदेहाची ओळखत पटवत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अवघ्या ४८ तासात या खूनाचा छडा लावला. मूकबधिर असलेल्या कृष्णा पंढरीनाथ धनवडे (रा.गदेवाडी, जि. बुलढाणा) या तरुणाचा पूर्वनियोजित कट रचून गळा आवळून खून करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी भाचे-जावयासह दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. यात एका विधीसंघर्ष बालकाला देखील ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना दिली.सागर केसापुरे, ऋषिकेश सखाराम गायकवाड (वय २२, रा. दुधड) असे अटक आरोपींची नावे आहेत. तर या प्रकरणात एका विधी संघर्ष बालकाचा देखील समावेश असल्याचे पोलिसांनी नमूद केले. १५ डिसेंबर रोजी पैठण तालुक्यातील पाटेगाव येथील गोदावरी नदीच्या पुलाखाली प्लास्टिकच्या गोणीत हातपाय बांधलेला आणि गळ्याला फास दिलेल्या अवस्थेतील एक मृतदेह आढळून आला होता.

## ; रेल्वे स्टेशनवर दिवसाढवळ्या थरार, एका मोबाईलसाठी भुरटे जीवावर उठले

**जालना :** जालना शहरात मागील काही दिवसांपासून गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. विशेषतः रेल्वे स्टेशन परिसरात रोज हाणामारी, लूटमार तसेच प्रवाशांना मारहाण करण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. अशीच एक धक्कादायक घटना जालना रेल्वे स्टेशन परिसरात घडली असून, त्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, आज शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे १ वाजेच्या सुमारास परतूर येथील रहिवासी विष्णू मगर (वय ४५) हे काही कामानिमित्त रेल्वेने जालना शहरात आले होते. रेल्वे स्टेशन परिसरातून बाहेर जात असताना तेथे उपस्थित असलेल्या काही भोरट्या चोरट्यांनी त्यांना अडवले. त्यानंतर त्यांची अंगझडती घेऊन खिशातील रोख रक्कम व मोबाईल फोन हिसकावून घेतला.या चोरट्यांनी एवढ्यावरच न थांबता, विष्णू मगर यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न करताच त्यांच्याजवळील धारदार चाकू काढून त्यांच्या बरगडीत वार केला. अचानक झालेल्या चाकू हल्ल्यामुळे विष्णू मगर घाबरले आणि जीवाच्या भीतीने मोबाईल व पैसे चोरट्यांच्या हातात असतानाच तेथून पळ काढला.रेल्वे स्टेशन परिसरातून बाहेर येताच त्यांनी मदतीसाठी आरडाओरड सुरू केली. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या काही तरुणांनी त्यांची मदत केली. विष्णू मगर पूर्णतः रक्ताने माखलेले असल्याचे दिसून येत होते. तात्काळ एक ऑटो रिक्षा बोलावून त्यांना जालना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.या घटनेची माहिती कदीम पोलीस ठाण्याला देण्यात आली. माहिती मिळताच कदीम पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मोरे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर त्यांनी जिल्हा रुग्णालयात जाऊन जखमी विष्णू मगर यांची विचारपूस केली व त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

तपासणीदरम्यान विष्णू मगर यांच्या डोक्याला आणि बरगडीत धारदार चाकूचे गंभीर वार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. सध्या त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून, हल्ला करणाऱ्या चोरट्यांचा शोध पोलीस घेत आहेत. रेल्वे स्टेशन परिसरात झालेल्या या घटनेमुळे संपूर्ण जालना शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# लग्नाच्या आमिषाने विद्यार्थिनीवर अत्याचार, व्हिडिओ शूट करत ब्लॅकमेल

**बंगळुरु :** १७ वर्षीय विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार करुन ब्लॅकमेल केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर मगदी पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे. लग्नाच्या बहाण्याने सुरु झालेल्या या नात्याचे रुपांतर डिजिटल ब्लॅकमेल, लैंगिक अत्याचार आणि बलात्काराचे व्हिडिओ व्हायरल करण्यात झाले आहे. विकास (२५), प्रशांत (१९) आणि चेतन (२८) हे तीन संशयित सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत. अनेक महिने चाललेल्या या अत्याचाराच्या घटनाक्रमाची माहिती पोलीस घेत आहेत.

ही घटना सुमारे आठ महिन्यांपूर्वी सुरु झाली. पीडित महाविद्यालयीन विद्यार्थिनीची भेट २५ वर्षीय विकासशी झाली. दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. विकासनं मुलीशी लग्न करण्याचे वचन दिले होतेबंगळुरु दक्षिणचे पोलीस अधीक्षक श्रीनिवास गौडा यांनी दिलेल्या माहितीनुसार पीडित विद्यार्थिनी आणि आरोपी एकमेकांना ओळखत होते. ते एकाच वसाहतीत राहत होते आणि एकाच समाजाचे होते. या जवळीकतेमुळे सुरक्षिततेची एक खोटी भावना तरुणीच्या मनात निर्माण झाली होती. पोलिसांच्या अहवालानुसार, सप्टेंबरमध्ये विकासने त्या मुलीला मगदी येथील आपल्या घरी बोलावले. तिथे विकासने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडितेला कल्पना नसताना विकासने हा प्रकार गुपचूप आपल्या मोबाईल फोनमध्ये रेकॉर्ड केला. त्याचा वापर त्याने नंतर तिला धमकावण्यासाठी एक शस्त्र म्हणून केला.

ऑक्टोबरमध्ये परिस्थिती आणखी चिघळली, जेव्हा विकासने त्या फुटेजचा वापर करून किशोरवयीन मुलीला ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. व्हिडिओ सोशल मीडियावर लीक करण्याची धमकी देऊन त्याने तिला आपल्या घरी परत येण्यास भाग पाडले. याच भेटीदरम्यान, विकास आणि त्याचे



दोन साथीदार प्रशांत आणि चेतन यांनी पीडितेवर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप आहे.या टोळक्याने सामूहिक बलात्काराचे चित्रीकरण करत ते फुटेज व्हायरल करण्यास सुरुवात केली. जेव्हा पीडितेने अखेरीस विकासच्या सततच्या मागण्यांना विरोध करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्याने बदनामीची धमकी देत तो व्हिडिओ इन्स्टाग्रामद्वारे तिला पाठवल्याचा आरोप आहे. छळ असह्य झाल्याने बुधवारी पीडितेने आपल्या कुटुंबाला ही गोष्ट सांगितली. त्यांनी तात्काळ औपचारिक तक्रार दाखल करण्यासाठी मगदी पोलीस ठाण्यात संपर्क साधला. गुरुवारपर्यंत पोलिसांनी तिन्ही आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक केली. अधिकाऱ्यांनी फॉरेन्सिक तपासणी करण्यासाठी आणि हे व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफफॉर्मवर किती मोठ्या प्रमाणावर शेअर केले गेले होते हे निश्चित करण्यासाठी आरोपींचे मोबाईल फोनही जप्त केले.आम्ही गुन्हा दाखल करुन तिन्ही आरोपींना अटक केली आहे' असे एसपी श्रीनिवास गौडा यांनी सांगितले. 'त्यांनी सामूहिक बलात्कार करण्यापूर्वी तिला ब्लॅकमेल करण्यासाठी तिच्या खाजगी फोटोंचा गैरवापर केला.' या तिघांवर भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विजयानंतरही सूर्यकुमार कोणावर होता नाराज, सामना संपल्यावर सांगितलं खेळाडूचं नाव

**अहमदाबाद :** भारतोन पाचवा टी २० सामना जिंकला आणि मालिकाही खिशात टाकली. भारतीय संघासाठी हा सर्वात आनंदाचा क्षण होता. पण पण तरीही भारताच्या विजानंतर सूर्या हा एका महत्वाच्या खेळाडूवर सर्वात जास्त नाराज असल्याचे पाहायला मिळाले. सामना संपला आणि त्यानंतर होणाऱ्या पारितोषिक वितरण सोहळ्यात सर्वांपुढे सूर्याने त्या खेळाडूचे नाव घेतले.

हार्दिक पंड्या आणि तिलक वर्मा यांच्या तडाखेबंद अर्धशतके आणि वरुण चक्रवर्तीच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने मालिकेतील अखेरच्या पाचव्या टी-२० क्रिकेट सामन्यात दक्षिण आफ्रिकेसमोर ३० धावांनी मात केली. यासह भारतीय संघाने मालिका ३-१ अशी जिंकली.सॅमसन परतल्यानंतर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या त्या भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादववर. त्याच्याकडून अपेक्षित कामगिरी होत नसल्याने टीका होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर तो कशी कामगिरी करतो, याबाबत औत्सुक्य होते. मात्र, पुन्हा एकदा तो अपयशी ठरला. बॉशने त्याला मिलरकरवी झेलबाद केले. सूर्याला केवळ पाच धावा करता आल्या. या मालिकेतील चार सामन्यांत मिळून त्याला ३४ धावाच करता आल्या.सामना संपल्यावर सूर्या म्हणाला की, ‘ क्रिकेट कसे खेळायला हवे, याचा उत्तम वस्तुपाठ आम्ही यावेळी दाखवून दिला. काही दिवस आम्हाला ती लय सापडत नव्हती, पण या सामन्यात मात्र आम्ही लयीत आलो. या सामन्यात आम्ही एक प्रयोग केला होता. जसप्रीत बुमराहला पॉवर प्लेमध्ये फक्त एकच षटक दिलं आणि त्यानंतर त्याच्या गोलंदाजीचा फायदा आम्ही सहा षटकांनंतर उचलला. एक कर्णधार म्हणून मालिका विजयामुळे मी आनंदी आहे. पण पण सूर्या एक फलंदाज म्हणून या मालिकेत कुठेच पाहायला मिळाला नाही आणि त्यामुळेच मी निराश आहे. माझ्यामते या मालिकेत सूर्या एक फलंदाज कुठे दिसला नाही, माझ्यासाठी ती गोष्टी महत्वाची आहे. पण आम्ही या मालिकेत दमदार कमबॅक करू शकलो, हे संघासाठी सर्वात महत्वाचे आहे. ‘तेराव्या षटकात भारताची ३ बाद ११५ अशी स्थिती झाली होती. सूर्यकुमार परतल्यानंतर आलेल्या हार्दिकने दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांवर जोरदार हल्लाबोल केला. दुसरीकडे, तिलकही फटकेबाजी करीत होता. या दोघांनी ४४ चेंडूंत १०५ धावांची भागीदारी रचली आणि भारतीय संघाला दोनशे धावांचा टप्पा पार करून दिला. त्यांच्या फटकेबाजीमुळे भारतीय संघाने २३१ धावांपर्यंत मजल मारली.




## हार्दिक पंड्या ठरला धुरंधर, भारताचा दक्षिण आफ्रिकेवर दणदणीत विजय

**अहमदाबाद :** हार्दिक पंड्याची धमाकेदार फटकेबाजी आणि त्याला तिलक वर्माची मिळालेली तुफानी फलंदाजीची साथ.. या जोरावर भारताने पाचव्या आणि अखेरच्या टी २० सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर विजय साकारला. या दोघांनीही धडाकेबाज फटकेबाजी करत अर्धशतक झळकावली आणि त्यामुळेच भारताला २० षटकांत २३१ धावांचा डोंगर उभारता आला. या आव्हानाचा पाठलाग करतान दक्षिण आफ्रिकेने दमदार फलंदाजी केली खरी, पण त्यांना विजय काही साकारता आला नाही. भारताने या सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर सहज विजय साकारत वर्षांचा शेवट गोड केला. भारताने या सामन्यात दक्षिण आफ्रिकेवरर ३० धावांनी विजय साकारला आणि मालिका ३-१ अशी सहजपणे जिंकली.भारताला संजू सॅमसन आणि अभिषेक वर्मा यांनी झोकात सुरुवात केरून दिली होती. पण या दोघांनाही अर्शशतकं पूर्ण करता आली नाहीत. पण ही कसर तिलक वर्मा आणि हार्दिक पंड्या यांनी भरून काढली.




तिलक वर्माने यावेळी भारताच्या डावाला चांगला आकार दिला आणि मोठ्या धावांचा पाया रचला, त्यावर हार्दिक पंड्याने कळस चढवला. कारण हार्दिकने पहिल्याच चेंडूपासून दणकेबाज फटकेबाजीला सुरुवात केली. पहिल्याच चेंडूवर हार्दिकने षटकार वसूल केला.हार्दिकने आपले अर्धशतक १६ चेंडूंत झळकावले खरे, पण त्यामध्ये पाच षटकार आणि चार चौकारांचा समावेश होता, म्हणजेच ९ चेंडूंत त्याने ४६ धावा पूर्ण केल्या होत्या. पण हार्दिकपूर्वी तिलक वर्माने दमदार फटकेबाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले होते. हार्दिक आणि तिलक यांनी चौथ्या विकेटसाठी १०५ धावांची भागीदारी रचली आणि तिथेच हा सामना भारताच्या बाजूने झुकायला सुरुवात झाली. हार्दिकने यावेळी २५ चेंडूंत पाच चौकार आणि पाच षटकारांच्या जोरावर ६३ धावा केल्या. तिलक अखेरच्या षटकापर्यंत मैदानात राहीला आणि त्याने ४२ चेंडूंत १० चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ७३ धावा केल्या.भारताच्या २३२ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या क्विंटन डीकॉकने एकामागून एक फटक्यांची अतिषबाजी केली आणि आपले अर्धशतक पूर्ण केले. डेव्हाल्ड ब्रेव्हिस त्याला चांगली साथ देत होता. पण जसप्रीत बुमराहने क्विंटन डीकॉकला बाद केले आणि त्यानंतर हा सामना भारताच्या दिशेने फिरायला सुरुवात झाली. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेची गोलंदाजी गडगडली आणि भारतान विजय साकारला.

## भारतासाठी अजून एक गुड न्यूज

**अहमदाबाद :** तिसऱ्या टी २० सामन्यात भारताने दमदार पुनरागमन केले आणि त्यांनी तिसरा सामना जिंकला. त्यामुळे भारताला २-१ अशी आघाडी मिळवता आली होती. चौथा टी २० सामना लखनौ येथे होणार होता, पण धुरक्यामुळे हा सामना रद्द करावा लागला. त्यामुळे पाचव्या आणि अखेरच्या सामन्याला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले होते. कारण हा सामना जिंकून दक्षिण आफ्रिकेला मालिकेत बरोबरी करता आली असती, तर भारताला विजय मिळवून मालिका जिंकता आली असती. त्यामुळे हा सामान दोन्ही संघांसाठी महत्वाचा होता.भारताने या महत्वाच्या सामन्यात दमदार कामगिरी केली. फलंदाजीमध्ये हार्दिक पंड्या आणि तिलक वर्मा यांनी छाप पाडली. गोलंदाजीमध्ये वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पंड्या यांनी विकेट्स मिळवत भारताच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. पण भारताच्या या विजयात सिंहाचा वाटा राहीला तो अष्टपैलू हार्दिक पंड्याचा. भारताने पाचव्या टी २० सामन्यात विजय साकारला आणि त्यानंतर त्यांच्यासाठी एक गुड न्यूज आली आहे. भारताने हा सामना जिंकला आणि मालिका ३-१ अशी सहजपणे खिशात टाकली. पण भारताने आपली एक परंपरा




कायम राखली आहे. कारण २०१५ पासून भारताने एकही टी२० मालिका (ज्यामध्ये तीनपेक्षा जास्त सामन्यांची मालिका खेळवली गेली) आपल्या देशात गमावलेली नाही. भारताने दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले आणि ही मालिका जिंकली. त्यामुळे भारताच्या टी २० मालिकेची गेल्या १० वर्षांतील परंपरा कायम राहीली आणि भारताच्या चाहत्यांसाठी ही गुड न्यूज असेल.भारताने हा महत्वाचा पाचवा टी २० सामना जिंकला आणि सामना संपल्यावर त्यांच्यासाठी अजून एक आनंदाची बातमी आली आहे.

# त्या एका चेंडूनंतर भारताच्या बाजूने सामना फिरला

**अहमदाबाद :** अहमदाबादच्या पाटा खेळपट्टीवर भारताने २३१ धावा केल्या होत्या खऱ्या, पण तरीही त्यांना विजयाची खात्री नव्हती. कारण दक्षिण आफ्रिकेने दमदार सुरुवात केली होती आणि १० षटकांत ११८ धावा केल्या होत्या, त्यामुळे हा सामना दक्षिण आफ्रिकेचा संघही जिंकू शकत होता. पण त्यानंतर एका चेंडूमुळे हा सामना भारताच्या बाजूने फिरल्याचे पाहायला मिळाले. कारण त्यावेळी तो एकच चेंडू भारताच्या विजयाचा टर्निंग पॉइंट ठरल्याचे पाहायला मिळाले.भारताच्या २३२ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेने दमदार सुरुवात केली होती. क्विंटन डीकॉकने अर्धशतक साजरे केले होते, त्याला साथ देण्यासाठी मैदानात डेव्हाल्ड ब्रेव्हिस नावाचा धडाकेबाज फलंदाज होते. डीकॉक आणि ब्रेव्हिस हे भारताच्या गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेत होते. त्यावेळी दक्षिण आफ्रिकेचा संघ भारताचे आव्हान पूर्ण करेल, असे वाटत होते. पण त्यावेळी एक अशी गोष्ट घडली जी भारताच्या विजयाची टर्निंग पॉइंट ठरली.




ही गोष्ट घडली ती ११ व्या षटकात. दक्षिण आफ्रिकेने १० षटकांत ११८ धावा केल्या होत्या. त्यामुळे भारताच्या हातून यावेळी सामना निसटण्याची शक्यता होती. पण यावेळी सूर्यकुमार यादवने चाणाक्षपणा दाखवला. सूर्यकुमार यादवने यावेळी विकेट मिळवण्यासाठी गोलंदाजीला आणले ते जसप्रीत बुमराहला. क्विंटन डीकॉक आणि डेव्हाल्ड ब्रेव्हिस यावेळी आक्रमक करत होते. पण या षटकाच्या दुसऱ्याच चेंडूवर बुमराहने कमाल केली. बुमराहचा सामना यावेळी करत होता तो क्विंटन डीकॉक. बुमराहने यावेळी एवढा वेगवान चेंडू टाकला तो डीकॉकला समजला नाही. डीकॉक मोठा फटका मारण्यासाठी गेला खरा, पण त्याला हा चेंडू समजलाच नाही. डीकॉकच्या बॅटवर हा चेंडू लागला आणि तो बुमराहच्या दिशेने उडाला. त्यावेळी बुमराहने अप्रतिम झेल पकडला आणि डीकॉक बाद झाला. डीकॉक जसा बाद झाला, तसे त्यांचे फलंदाज एकामागून एक बाद होत राहीले. त्यामुळे क्विंटन डीकॉकला बाद करणारा जसप्रीत बुमराहचा तो चेंडू भारताच्या विजयासाठी टर्निंग पॉइंट ठरल्याचे पाहायला मिळाले. बुमराहने यावेळी आपल्यावर ठेवलेला विश्वास सार्थ ठरवला.दक्षिण आफ्रिकेचा संघही हा सामना जिंकला असता. पण हा सामना भाराताच्या बाजूने नेमका कुठे फिरला, हे आता समोर आले आहे.

# शरीरावर कमेंट्स, अभिनेत्री गेली होती ट्रॉमामध्ये



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री राधिका आपटेने आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. तिने साऊथ, मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. तसेच ती वेब सीरिजचा प्रसिद्ध चेहरा आहे. मात्र तिला सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. तिने एका मिडिया मुलाखतीत आपल्या करिअरच्या सुरुवातीच्या काळाविषयी सांगितले.

राधिका आपटेने मुलाखतीत सांगितल्यानुसार, तिने मोठ्या लोकांनी बनवलेल्या हिंदी चित्रपटांपासून स्वतःला दूर ठेवले. तथापि, २००० च्या दशकाच्या उत्तरार्धात तिने ज्या दक्षिण भारतीय चित्रपटांमध्ये काम केले होते, त्यातही तिला लिंगभेदाचा सामना करावा लागला. राधिका म्हणते की, 'मी अशा अनेक मोठ्या हिंदी चित्रपटांमध्ये काम केलेले नाही जिथे अशा प्रकारच्या गोष्टी घडतात. माझ्याकडे काही ऑफर होत्या आणि मी त्यांना भेटायला गेले होते. जेव्हा मला कळले तेव्हा मी म्हणाले, 'मी त्यांच्यासोबत कधीही काम करणार नाही... हे खूप वाईट लोक आहेत. खूप मोठे लोक. मी नावे सांगितली तर तुम्ही म्हणाल, 'काय?' पण मी त्यांच्यासोबत काम केले नाही. मग मी काही साऊथ चित्रपट केले, कारण मला पैशांची गरज होती.'

राधिका पुढे म्हणाली, 'मी ज्या काही चित्रपटांमध्ये काम केले होते त्यांच्या सेटवर मला अनेक अडचणी आल्या. मला आठवते की एकदा मी सेटवर एकटीच महिला होते. आम्ही एका छोट्या शहरात शूटिंग करत होतो. त्यांना माझ्या कंबरेवर आणि स्तनांवर अधिक पॅडिंग लावायचे होते. ते म्हणाले, 'अम्मा, जास्त पॅडिंग.' मी म्हणाले, 'आणखी किती पॅडिंग?' तुम्ही एखाद्याला किती गुबगुबीत बनवू शकता?' मी एकटीच महिला होते. माझा कोणी मॅनेजर नव्हता. एजंट नव्हता. माझ्या टीममध्ये सर्व पुरुष होते. कारण त्यांनी मला भूमिका दिली होती. ते म्हणाले, 'तुम्हाला तुमची स्वतःची टीम आणण्याची परवानगी नाही...'

राधिकाने सांगितल्यानुसार, सेटवर महिलांबद्दल अश्लील विनोद केले जायचे. त्यांच्या शरीरावर कमेंट्स केल्या जायचा. तुमचे शरीर कसे असायला हवे हे सांगताना आजूबाजूला एकही महिला नसतात. यासर्वांमुळे राधिकाचे मानसिक आरोग्य बिघडले. ती म्हणते की, 'सहसा मी खूप स्पष्टवक्ती आणि शूर असते. तरीही त्या दिवसांची आठवण येताच हृदय धडधडते. मला पुन्हा कधीही अशा परिस्थितीत राहायचे नाही, कारण मी रडेन. ते खरोखरच क्लेशकारक होते. कोणत्याही महिलेने अशा परिस्थितीत राहू नये. '


अभिनेत्रीने स्पष्ट केले की, ती या संस्कृतीसाठी फक्त पुरुषांना दोष देत नाही. ती म्हणाली, 'बऱ्याच महिला मोठ्या पदांवर आहेत ज्या बदल घडवून आणू शकतात, परंतु त्या तसे करत नाहीत आणि मला ते खूप त्रासदायक वाटते.'

# लग्न तर मी केलंय...' मुकेश अग्रवाल नव्हे तर कोणाबद्दल म्हणाल्या रेखा?



**मुंबई :** महिमा चौधरी आणि संजय मिश्रा यांचा 'दुर्लभ प्रसाद की दूसरी शादी' हा चित्रपट आज थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. काल या चित्रपटाचं स्क्रिनिंग आयोजित करण्यात आलं होतं. सिनेमाच्या स्क्रीनिंगला ज्येष्ठ अभिनेत्री रेखा यांनी हजेरी लावली होती. महिमा चौधरीसोबत पोज देताना रेखा यांनी लग्नाबद्दल भाष्य केलं आहे.दुर्लभ प्रसाद की दूसरी शादी' या चित्रपटाच्या स्क्रीनिंगदरम्यानच्या व्हायरल व्हिडिओमध्ये, रेखा आणि महिमा चौधरी पॅप्सशी बोलताना दिसत आहेत. रेखा पांढऱ्या सूटमध्ये आणि प्रिंटेड दुपट्ट्यात खूपच सुंदर दिसत आहेत. ७१ वर्षीय अभिनेत्रींने लाल लिपस्टिक आणि भांगात सिंदूर लावलं आहे. त्याचबरोबर रेखा यांनी काळ्या गॉगलही लावलाय.व्हिडिओमध्ये महिमा चौधरी म्हणतेय, 'मी दुसऱ्यांदा लग्न केलं आहे' त्यावर रेखा म्हणतात, 'वाह, हे असंच असायला पाहिजे. लग्न हे प्रेमाचं दुसरं नाव आहे. जर प्रेम असेल तर लग्न असतं. जर लग्न असेल तर प्रेम असतं. लग्न पहिलं असुदे किंवा दुसरं. लग्न तर मी केलं आहे आयुष्यासोबत...रेखा यांच्या वैयक्तिक आयुष्यात अनेक चढ-उतार आले आहेत. त्यांचं नाव अनेक सेलिब्रिटींशी जोडलं गेलं. विशेषतः रेखा आणि अमिताभ बच्चन यांच्या लव्हस्टोरीची चर्चा आजही केली जाते. मात्र, हे जोडपं वेगळं झालं. रेखा यांनी दिल्लीतील उद्योगपती मुकेश अग्रवाल यांच्यासोबत लग्न केलं. पण, लग्नाला एक वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच मुकेश यांनी आत्महत्या केली. तेव्हापासून रेखा अविवाहित आहेत.रेखा अविवाहित असूनही त्या कायम सिंदूर लावतात. त्यामुळे अभिनेत्री सिंदूर का लावते? असा प्रश्न चाहत्यांना पडतो. त्यावर रेखा म्हणालेल्या की, ही त्यांच्यासाठी एक स्टाइल आहे.

# 'धुरंधर'ने बॉक्स ऑफिसवर घातला धुमाकूळ



**मुंबई :** आदित्य धरचा 'धुरंधर' हा चित्रपट ५ डिसेंबर रोजी प्रदर्शित झाला. प्रदर्शित होऊन १३ दिवस झाले आहेत आणि चित्रपट नवनवीन टप्पे गाठत आहे. चित्रपटात रणवीर सिंग हमजाची भूमिका साकारत आहे. चित्रपट आणि त्यातील कलाकारांना इतके प्रेम मिळत आहे की सर्वजण त्याचे कौतुक करत आहेत.

धुरंधरने दाखवून दिले आहे की जेव्हा प्रेक्षक खरोखर चित्रपटावर प्रेम करतात तेव्हा तो चित्रपट सगळे रेकॉर्ड ब्रेक करु शकतो. फक्त दोन आठवड्यात चित्रपट ५०० कोटींच्या जवळ पोहोचला आहे. प्रदर्शित होताना कदाचित कोणीही इतक्या उल्लेखनीय यशाची कल्पना केली नसेल.

चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर २८ कोटींची सुरुवात केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ३२ कोटी आणि तिसऱ्या दिवशी ४३ कोटींची कमाई केली. यामुळे पहिल्या आठवड्यात एकूण कलेक्शन २०७.२५ कोटींवर पोहोचले. धुरंधरसाठी सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे दुसऱ्या आठवड्यात त्याने पहिल्यापेक्षाही जास्त कलेक्शन केले. या चित्रपटाने ९ व्या दिवशी ५३ कोटी आणि १० व्या दिवशी ५८ कोटी कमावले. धुरंधरने १४ व्या दिवशी २३ कोटी कमावले. यामुळे चित्रपटाची एकूण कमाई ४६०.२५ कोटी झाली आहे.

चित्रपटाने पाच दिवसांत २०० कोटींचा टप्पा ओलांडला. धुरंधरने पुष्पा २ चा विक्रम मोडला आहे. अवघ्या सहा दिवसांत २३० कोटी कमावून, धुरंधरने पठाण (४४६.२ कोटी), पुष्पा २ (१९६.५० कोटी), छावा (१८०.२५ कोटी), बाहुबली २ (१४३.२५ कोटी) आणि स्त्री २ (१४१.४० कोटी) या चित्रपटांच्या दुसऱ्या आठवड्यातील कमाईला मागे टाकले आहे.

# आताचा काळ लहानांकडून शिकण्याचा, सचिन पिळगावकरांची भावना, श्रिया म्हणाली, माझ्या बाबांमध्ये मुलासारखी..



**पुणे :** 'माझ्या आजवरच्या प्रवासाचे श्रेय माझे दिग्दर्शक, सहकलाकारांना आहे. किती वर्षांची कारकीर्द केली, यापेक्षा काय काम केले हे महत्त्वाचे आहे. आताचा काळ हा लहानांकडून शिकण्याचा आहे. बदल स्वीकारत पुढे जात राहिले पाहिजे. आपल्या कलाकृतींतून लोकांना आनंद द्यायचा प्रयत्न करीत आलो,' अशी भावना ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर यांनी शुक्रवारी व्यक्त केली.राष्ट्रीय पुस्तक न्यासातर्फे आयोजित पुणे पुस्तक महोत्सवातील पुणे लिट फेस्टमध्ये 'टू जर्नीज टू लीगसीज - स्टोरीज ॲक्रॉस जनरेशन्स' या विषयावरील सत्रात ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर, अभिनेत्री श्रिया पिळगावकर यांनी सहभाग घेतला. त्यांच्याशी पराग छापेकर यांनी संवाद साधला.सचिन पिळगावकर यांनी चित्रपटसृष्टीतील त्यांचे अनुभव, आठवणींना उजाळा दिला. श्रिया यांनी त्यांचे अनुभव, चित्रपटसृष्टीतील कार्यरत आई-वडिलांचे मार्गदर्शन याविषयी भाष्य केले. सचिन पिळगावकर म्हणाले, की हिंदी चित्रपटसृष्टीत माझ्या वाट्याला एकसारखे काम येत असल्याने दिग्दर्शनाकडे वळलो. श्रिया कधी अभिनेत्री होईल, असे वाटले नव्हते. मात्र, तिचे एका नाटकातील काम पाहिल्यावर ती अभिनय करू शकते असे वाटले. तिने तिचे स्थान निर्माण केले आहे, याचा अभिमान वाटतो.बाबांमध्ये मुलासारखी निरागसता आहे. मनोरंजनाच्या क्षेत्रात काम करताना स्वतःला जमिनीवर ठेवणे, मानसिक संतुलन राखणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या प्रचंड स्पर्धेच्या काळात यश म्हणजे काय, स्वतःची किंमत काय हे ठरवले पाहिजे, असं श्रिया पिळगावकर म्हणाली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पोलिसाचे बंद घर फोडून दागिने, भांडी लंपास !



जनसंचलन/बुलढाणा

शहरातील काँग्रेस नगर परिसरात बंद घर फोडून चोरट्याने दागिने व घरगुती भांडी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शुक्रवारी बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतीक प्रदीप पवार (रा. काँग्रेस नगर) हे आरसीपी मेहकर पोलिस ठाण्यात कार्यरत असून, १० डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता ते कर्तव्यावर जाताना घराला कुलूप लावून गेले होते. त्यानंतर १६ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घरी परतल्यानंतर चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घराचे मुख्य दार उघडल्यावर आतून दुसरा दरवाजा बंद असल्याचे दिसून आले. मागील बाजूची पाहणी केली असता मागील दरवाजा तुटलेला आढळून आला. घरात प्रवेश केल्यानंतर तांबे-पितळी भांडी, देवघरातील मूर्ती तसेच सोन्याच्या कानातील बाळी असा सुमारे ७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जिल्ह्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे आकडेवारीवरुन दिसून येत आहे. चोरीच्या गुन्ह्यांच्या तपासावरही परिणाम झालेला आहे. पोलिसाच्या घरात घरफोडी करण्यापर्यंत मजल गेली आहे. त्यामुळे चोरट्यांचे धाडस वाढल्याचे चित्र दिसत आहे. चोरीस गेल्याचे निष्पन्न झाले. घटनेची माहिती मिळताच बुलढाणा शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस हवालदार सुभाष म्हस्के करीत आहेत.

# दारू विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा दारूविक्रीविरोधात अवैध पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारत सुंदरखेड येथे हातभट्टी दारू तयार करुन साठवणूक करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी रंगेहाथ पकडले. या कारवाईत १५ लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली असून, संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुलढाणा शहर पोलिस ठाण्याच्या पथकाने बुधवारी सुंदरखेड परिसरात धाड टाकली. दिसल्याने पोलिसांनी नीलेश यादरम्यान संशयास्पद हालचाली रामदास मोरे (वय ३२, रा. सुंदरखेड) याची झडती घेतली असता त्याच्या ताब्यातील प्लास्टिक कॅनमध्ये १५ लिटर हातभट्टी दारू आढळून आली. सदर दारू व कॅन मिळून अंदाजे १,५५० रुपये किमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, तपास पोलिस हवालदार सुभाष म्हस्के करीत आहेत.

# रोहीच्या धडकेत दोन दुचाकीस्वार जखमी

जनसंचलन/मेहकर




उमरा येथून मालेगाव तालुक्यातील अमानीकडे जात असताना रोहीने दुचाकीला धडक दिल्याने दोन युवक गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी दुपारी मेहकर-डोणगाव मार्गावरील हिवरा साबळे फाट्यानजीक घडली. या अपघातात उमरा येथील ऋषिकेश मनोहर वानखेडे (वय २०) व कपिल मधुकर वानखेडे (२१) हे दोघे जखमी झाले. दुचाकीसमोर अचानक रोही आडवे आल्याने वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात झाला. जखमींना तत्काळ मेहकर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले

# मेरा खुर्द येथील शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या...

जनसंचलन/ अंढेरा



सततची नापिकी आणि कर्जाचा वाढता ताण, यामुळे मानसिक तणावाखाली असलेल्या एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना मेरा खुर्द येथे १९ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारास घडली. मेरा खुर्द येथील रहिवासी अनिल गंगाराम उदार (वय ३५) हे कोरडवाहू शेतीवर अवलंबून होते. त्यांच्या कुटुंबाकडे गट क्रमांक २२१ मधील शेती असून, यावर्षी अपेक्षित उत्पादन न झाल्याने आर्थिक अडचणी वाढल्या होत्या. बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा मेरा खुर्द येथून घेतलेले ३१ हजार रुपयांचे पीक कर्ज तसेच बालाजी अर्बन चिखली पतसंस्थेकडून घेतलेल्या १ लाख ५० हजार रुपयांची कर्ज असल्याने तणावात ५० हजार रुपयांच्या कर्जफेडीची चिंता त्यांना सतावत असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने संपूर्ण कुटुंब मोलमजुरी करून उदरनिर्वाह करत होते. या आर्थिक विवंचनेतून अनिल उदार हे नैराश्यात गेले होते. सकाळी शेतात जातो, असे सांगून ते घराबाहेर पडले; मात्र शेतातील झाडाला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे त्यांच्या भावाच्या निदर्शनास आले. भावाने तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला; मात्र तो निष्फळ ठरला. घटनेची माहिती मिळताच सरपंच रमेश अवचार व पोलिस पाटील संजय ठाकूर यांनी अंढेरा पोलिस ठाण्याचे ठाणेदार रूपेश शक्तरगे यांना कळविले

# नोकरीच्या नावाखाली दीड लाखांची फसवणूक...

जनसंचलन/बुलढाणा

नोकरी मिळवून देण्याच्या आमिषाला बळी पडून बुलढाणा तालुक्यातील एका सेवानिवृत्त नागरिकाची दीड लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. बनावट नियुक्तिपत्राद्वारे रक्कम उकळणाऱ्या अकोल्यातील युवकाविरुद्ध बुलढाणा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुंदरखेड येथील रहिवासी विलास हरिभाऊ मानवतकर (६०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मार्च २०२४ मध्ये आरोपी अंकित (अनिकेत) किरण मोहोड (रा. अकोला) याने आयुष्मान भारत मिशन ऑर्गनायझेशन अंतर्गत खासगी तत्त्वावर आरोग्य सेवक पदावर नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवले. विश्वास संपादन करून त्याने मानवतकर यांचा मुलगा अमित याची शैक्षणिक कागदपत्रे मागवून घेतली. नोकरीच्या बदल्यात सुरुवातीला १० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती; मात्र तडजोडीनंतर नियुक्ती आदेश मिळाल्यानंतर उर्वरित रक्कम देण्याचे ठरले. त्यानुसार ८ व १५ मार्च रोजी फोन पेच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने एकूण १ लाख ५० हजार रुपये आरोपीच्या खात्यावर पाठविण्यात आले. यानंतर, २७ मार्च रोजी नियुक्तिपत्र बनावट असल्याचे संबंधित कार्यालयात चौकशीदरम्यान स्पष्ट झाले. रक्कम परत मागितल्यानंतर आरोपीने टाळाटाळ करत अखेर संपर्क तोडला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शशिकांत धारकरी करीत आहेत

# सर्व वादांची मुळे नकारात्मक विचारांतच

## - ललितप्रभ सागर महाराज

जनसंचलन/बुलढाणा

सर्व भांडणांची, तणावांची आणि नात्यांतील दुराव्याची मुळं नकारात्मक विचारांत असतात, तर प्रत्येक समस्येचा उपाय सकारात्मक विचारांवर आधारलेला असतो, असे प्रतिपादन राष्ट्रसंत महोपाध्याय श्री ललित प्रभ सागरजी महाराज यांनी केले. दादावाडी परिसरातील एआरडी लॉन्स येथे आयोजित दोनदिवसीय जगण्याची कला प्रवचनमालेच्या पहिल्या दिवशी ते भाविकांना संबोधित करत होते. संकुचित, राष्ट्रसंत म्हणाले की, स्वार्थी, निराशावादी व अहंकारी विचार ही मनातील विकृती आहे. अशा विचारांची झुडपे उपटून टाकली, तर जीवन आनंदी व समृद्ध होते. ग्लास अर्धा रिकामा पाहणारे नाती तोडतात, तर अर्धा भरलेला पाहणारे नाती जपतात; मात्र उंची गाठणारे लोक ग्लास पूर्ण भरलेला पाहतात, असा दृष्टान्त त्यांनी दिला. घर, कुटुंब, शेजारी किंवा सहकाऱ्यांविषयी केवळ दहा मिनिटे सकारात्मक विचार करून पाहिल्यास कटुता कमी होते, असा सल्लाही त्यांनी सकारात्मक विचार केल्यास कटुता कमी होते. अनावश्यक वाद टाळण्याचेही केले आवाहन दिला. अनावश्यक वाद, टोमणे व टीका शत्रू वाढवतात, तर समन्वयाची भूमिका जीवन सुलभ करते, असे सांगत राष्ट्रसंतांनी ईश्वरावर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. आयुष्यात ९९ दरवाजे बंद झाले तरी ईश्वर एखादा तरी दरवाजा उघडतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी डॉ. मुनिश्री शांतिप्रिय सागरजी महाराज यांनी हसण्याचे महत्त्व विशद करत, हसू हे आरोग्य व आनंदाचे सर्वांत प्रभावी औषध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन जिल्हाधिकारी किरण पाटील, आमदार चैनसुख संचेती, चंपालाल शर्मा, राजेश देशलहरा, जितेंद्र कोठारी, इंदरचंद कोटेचा व मोहन शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतगीत निकिता देशलहरा, रक्षा देशलहरा, निधी देशलहरा व भावना कोठारी यांनी सादर केले. मंचसंचालन राजेश देशलहरा यांनी केले, तर ॲड. जितेंद्र कोठारी यांनी आभार मानले. दरम्यान, घर-परिवार स्वर्ग कसा बनवावा या विषयावर रविवारी सकाळी एआरडी लॉन्स येथे विशेष प्रवचन व विराट सत्संग आयोजित करण्यात आला आहे.

# बुलढाणा नगरपालिकेवर शिवसेना पक्षाचा दणदणीत ऐतिहासिक विजय!.....



## पुजाताई गायकवाड यांच्या हातात आता नगर पालिका नगराध्यक्ष पदाची धुरा



**पुजाताई संजय गायकवाड शिवसेना पक्ष**

**मिळालेली मत १८५२५**

**लक्ष्मीताई दत्ता काकस काँग्रेस पक्ष**

**मिळालेली मत १३७४५**

**अर्पिताताई विजयराज शिंदे भाजप पक्ष**

**मिळालेली मत ४१४९**

जनसंचलन/बुलढाणा

बुलडाणा नगरपालिकेच्या बहुप्रतिक्षित निवडणुकीत मतदारांनी विरोधी पक्षाला मोठा धक्का देत, शिवसेना बाजूने ऐतिहासिक कौल दिला आहे. शिवसेना पक्षाने निवडणुकीत विक्रमी जागा जिंकून एकहाती सत्ता मिळवत, बुलडाणा नगरपालिकाच्या राजकारणात नवा अध्याय सुरू केला आहे. हा विजय केवळ जागांचा नाही, सत्याचा हा विजय आहे. या विजयाने विरोधकांच्या झोपा उडाल्या आहे.बुलढाणा शहरात सर्व पक्ष एका बाजूने आणि शिवसेना पक्ष हा एका बाजूने होता.आणि या लढाई मध्ये शिवसेना पक्षाने विजय मिळवला आहे.आमदार संजय गायकवाड यांच्या दृष्टी आणि अभ्यासू पणामुळे हा दणदणीत विजय मिळाला आहे.महाविकास आघाडीला पराभवाची धूळ चारली आहे. आणि भाजपची अवस्था एवढी कमजोर केली कि भाजपचे उमेदवार यांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.आमदार संजय गायकवाड यांच्या पत्नी सौ पुजाताई संजय गायकवाड यांची यापूर्वी दोन वेळा संधी हुकली मात्र त्यांनी यावेळेस त्यांना नगराध्यक्ष बनवूनचं दाखविले.घरातील सदस्य जसे की मुलगा आणि पुतण्या व विहीणबाईला सुध्दा विजय मिळवून देत त्यांना नगरसेवक या पदावर बसविले आहे.एकुण ३० पैकी आपल्या शिवसेना पक्षाचे २२ उमेदवार निवडून आणले आहे. हि काही सोपी गोष्ट नव्हती मात्र ती पूर्ण करून दाखविली आहे.आणि विशेष्ट प्रभाग १३ मधील दोन्ही अपक्ष उमेदवार पती पत्नी माझेच असल्याचे त्यांनी प्रसारमाध्यांसमोर सांगितले आहे.काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांच्या बाली किल्यात त्यांचाच उमेदवार बोल्ड करणे आणि भाजप जिल्हाध्यक्षांना हिट विकेटची परिस्थीती निर्माण केली आहे.

शिवसेनेने केलेली कामगिरी सर्वोत्कृष्ट म्हणावी लागेल. शिव सेनेच्या धनुष्यबाणापुढे काँग्रेस आणि भाजपची धूळधाण झाली. एकुण झालेल्या ३७२१४ या मतदानापैकी एक अष्टांश मतेसुद्धा भाजपला पडू शकली नाही. डिपॉझिट वाचविण्यासाठी ४६५२ मतांची आवश्यकता होती. सौ. अर्पिता विजयराज शिंदे यांना केवळ ४१४९ मते पडली आहेत. भाजप, काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रत्येकी दोन नगरसेवकच निवडून येवू शकले. काँग्रेसच्या उमेदवार सौ. लक्ष्मीताई दत्ता काकस यांनी निकराची झुंज दिली. परंतु त्यांना १३७४५ मतांवर थांबावे लागले, त्यांचे पति तसेच काँग्रेस शहराध्यक्ष दत्ता काकस यांचाही पराभव झाला. ते प्रभाग ७ मधून नगरसेवक पदावर निवडणूक लढवित होते. त्यांच्या मातोश्री यमुनाताई काकस या सुद्धा प्रभाग ६ मधून पराभूत झाल्यात. भाजप शहराध्यक्ष मंदार बाहेकर यांच्या पत्नी सरलाताई यांचा शिवसेनेच्या उमेदवाराने पराभव केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मशालला बुलढाण्यात एकही जागा मिळू शकली नाही. मागील वर्षी विधानसभेत ज्या मशालला १७४५ मतांचा लिड होता, त्या मशालचा एकही उमेदवार निवडून येवू शकला नाही. काँग्रेसमधून उबाठात गेलेले सुनिल सपकाळ २०७मतांनी नगरसेवक पदापासून वंचित राहीले. वंचित बहुजन आघाडी, बसपा यांना एकही खाते उघडता आले नाही. आम आदमी पार्टीच्या मनिषाताई प्रशांत मोरे यांना १६८ तर उर्मीलाताई सतिश रोठे यांना १२८ मते मिळालीत. आश्वर्य म्हणजे नोटा बटन १८२ जणांनी दाबले. बसपाच्या रेखाताई सुरेश चव्हाण यांना १९३, अहमद रजिया अतिक यांना ३०६ मते मिळाली आहेत. मतमोजणीनंतर शिवसे नेकडून मोठी रॅली निघाली. गुलालांचे सिलेंडर शहराने अनुभवले. फटाक्यांची आतिषबाजी आणि डी.जे.चा धडाका शिवसे-नेच्या कार्यकर्त्यांचा उत्साह कमी होवू देत नव्हता. निवडणूक विभागाची जबाबदारी डोक्यावर घेतलेल्या महसुल कर्मचाऱ्यांनी उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी शरद पाटील यांच्या नेतृत्वात बखूबी निभावली. पोलिस प्रशासन मुस्तैद राहीले. कुठलाही अनुचित प्रकार कुठेही घडून आला नाही.







बुलढाणा शहरात शिवसेना पक्षाचे उमेदवार सौ पुजाताई संजय गायकवाड यांच्या विजयाचा जल्लोष साजरा करतांना...

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८